# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर,
नरिमन पॉईंट, मुंबई - २१.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/२४० दिनांक १५ जानेवारी, १९९९

## तांत्रिक परिपत्रक क्र. ६

विषय : निविदेमध्ये पाईप लाईनच्या चरासाठी वापरावयाच्या खोदकामाचे दर.
संदर्भ : या कार्यालयाचे दि.२५ सप्टेंबर, १९९८ चे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३१२६.

वरील संदर्भीय पत्रान्वये जलवाहिन्यासांठी खोदावयाच्या चरांसाठी निविदेमध्ये खोदकामांचे दर हे सर्व स्तरावरील खोदकामासाठी एक सरासरी दर लावण्यात यावा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. सरासरी दर काढताना मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदींवरील आधारित सरासरी दर काढणे (AVERAGE) अपेक्षित व आवश्यक आहे. तसेच खोदकामाच्या बाबींतील वर्णनात सर्व प्रकारच्या स्तरातील व कोणत्याही प्रकारे (ब्लास्टिंग, चिझलिंग किंवा मेकॅनिकल मीन्स) केलेल्या कामासाठी सदर खोदकामाचे दर असल्याचेही निविदेत स्पष्ट करण्यात यावे असे कळविण्यात आले आहे. या संदर्भात खालीलप्रमाणे दोन बाबींचा खुलासा निविदेत असणे आवश्यक आहे.

१) निविदेअंतर्गत कोणत्याही बाबीचे प्रत्यक्षात झालेल्या कामाचे परिमाण (quantity) निविदेतील तरतूदीपेक्षा वाढले तर निविदेतील तरतूदीपेक्षा २५ % जास्त किंवा निविदेतील दराने रु.५,०००/- किंमतीचे परिमाण, यापैकी जे परिमाण जास्त असेल त्या परिमाणापर्यंतची कामे निविदेतील दराने करणे निविदेतील अटी व शर्तीनुसार ठेकेदारांना बंधनकारक असते. तथापि २५% पेक्षा जास्त किंवा निविदेतील दराने रु.५,०००/- किंमतीपेक्षा जास्त प्रमाणात परिमाण वाढले तर मात्र ठेकेदारास निविदेतील कलम ३८ नुसार वाढीव परिमाणाचे देयक देय असते.

पाईप लाईन्सच्या चरासाठी सर्वस्तरातील खोदकाम सरासरी दराने करावयाच्या निविदेतील बाबी संदर्भात वाढीव परिमाणासाठी कोणत्या दराने देयक अदा करण्यात येईल याबाबत पुढे वादविवाद होऊ नयेत म्हणून असा खुलासा करणे आवश्यक आहे की वेगवेगळ्या प्रकारच्या स्तरामधील खोदकामासाठी ज्या टक्केवारीनुसार निविदाअंतर्गत सरासरी दर काढण्यात आलेला आहे, त्याच टक्केवारीनुसार परंतु ज्यावेळी कामाचे परिमाण निविदाअंतर्गत परिमाणापेक्षा २५% पेक्षा जास्त अथवा निविदेतील दराने रु.५,०००/- किंमतीचे परिमाण यापैकी जे परिमाण जास्त असेल त्यापेक्षा जास्त वाढल्यास वाढीव परिमाणाचे देयक त्या त्या वेळच्या चालू दर सूचीतील संबंधित स्तरामधील खोदकामासाठी लाऊन निविदा कलम ३८ नुसार देय असलेल्या परिमाणासाठी दर काढण्यात येतील.

२) सर्वसाधारणपणे पाईपांसाठी खोदावयाच्या चरांसाठी खोली ही १ मी. असते. वेगवेगळ्या स्तरातील खोदकामाचे दरसूचीतील मूळ दर हे १.५० मीटर खोलीपर्यंतच्या कामासाठी काढलेले असतात. त्यामुळे जर निविदाअंतर्गत काम करीत असताना चराची खोली १.५० मी.पेक्षा जास्त झाली तर खालील काम हे दगडामधील खोदकाम असल्याने चालू दरसूची नुसार असलेल्या दगडाच्या खोदकामाच्या दराने वाढीव खोलीतील खोदकामाच्या कामाचे देयक अदा करण्यात यावे अशी मागणी ठेकेदारांकडून होण्याची शक्यता असल्याने याबाबत असा खुलासा करण्यात यावा की पाईपांच्या चराची खोली १.५० मी.पेक्षा जास्त झाल्यास निविदेतील दरापेक्षा फक्त संबंधित दरातील वाढीव लिफ्टसाठी (म्हणजेच १.५० मी.ते ३ मी.व ३ मी.ते ४.५० मी. ) जेवढे दर देय असतील तेवढाच अतिरिक्त दर निविदेतील दरमध्ये मिळवून त्या दराने १.५ मीटरपेक्षा जास्त खोलीसाठी केलेल्या खोदकामाच्या वाढीव परिमाणाचे देयक अदा करण्यात येईल.

या अनुषंगाने सर्व क्षेत्रीय अधिका-यांनी नवीन निविदा बोलवितांना निविदेत वरील दोन बाबींचा खुलासा करावा. ज्या निविदा बोलविण्यात आल्या आहेत, परंतु प्राप्त झालेल्या नाहीत अशा निविदांच्याबाबत ज्या ठेकेदारांना को-या निविदा विकण्यात आल्या आहेत त्या ठेकेदारांना स्वतंत्रपणे पत्र पाठवून अथवा ज्या निविदांच्या बाबतीत निविदा पूर्व बैठकी व्हावयाच्या आहेत अशा निविदांच्या बाबत निविदा पूर्व बैठकीत, वरील दोन मुद्दे सर्व संबंधित कंत्राटदारांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

(स्वाक्षरी) १८/१/९९

( राजेंद्र सगणे)

**सदस्य सचिव (तांत्रिक)**

प्रत :

१) खाजगी सचिव मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
कृपया वरील परिपत्रक मा.मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावे.

२) खाजगी सचिव मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
कृपया वरील परिपत्रक मा.मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावे.

३) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) श्री.माधव कुलकर्णी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य, १७-१८, व्दारका हाऊस, राम्बाग कॉलनी, पौड रस्ता, पुणे.

५) श्री.आदिनाथ नवले पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य,बलभीम चौक, तालुका-जिल्हा-बीड.

६) श्री.भानुदास पडळकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य, हिमगीरी बिल्डिंग, सिताराम नगर मराठा समाज, सांस्कृतिक भवनमागे, सांगली.

७) श्री.आशिष कुलकर्णी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य, ६४/१४९६/एम.आय.जी.कॉलनी, वरळी, मुंबई.

८) श्री.राजीव सरदेशपांडे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य, गुलमोहर अपार्टमेंट, फ्लॅट क्र.५, तळमजला, टिळकनगर, नागपूर.

९) विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे.

१०) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/नाशिक.

११) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाअधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.

१२) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ (सर्व)

१३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

M.J.P.
ISSUED
19 JAN 1999
MUMBAI-21.